|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव )

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.कबचौउमवि/7-अ/2151/2020 दिनांक: 13/10/2020

प्रति,

1) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

2) कबचौउमविंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख.

विषय:-दिनांक 21, 22, 23, 28 व 29 ऑक्टोबर, 2020 रोजी विद्यापीठाने आयोजीत केलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी व पदव्युत्तर वर्गांच्या परीक्षा बी.एड.,एम.पी.एड. व एम.सी.ए. अभ्यासक्रमाची सीईटी परीक्षा असल्यामुळे पुढे ढकलण्यात आल्याबाबत.........

संदर्भ:-1) Government of Maharashtra, State Common Entrance Test Cell, Maharashtra State, Mumbai यांचे पत्र क्र.STATE CET CELL/MAH-Higher Education/CET-2020/800, दिनांक 28.09.2020.

2) Government of Maharashtra, State Common Entrance Test Cell, यांचे पत्र क्र.Other-1219/061/CET/800/2020, दिनांक 28.09.2020.

महोदय/महोदया,

वरील विषयाच्या संदर्भांकित शासन पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दिनांक 21, 22, 23, 28 व 29 ऑक्टोबर, 2020 या तारखांना बी.एड., एम.पी.एड. व एम.सी.ए. अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षांचे तसेच यानंतर या अभ्यासक्रमांच्या फिल्ड टेस्टचे आयोजन महाराष्ट्र शासनाने केलेले असल्यामुळे सदर तारखांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था तसेच विद्यापीठ प्रशाळा/ विभागातील अंतिम वर्ष/ अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या (नियमित व बॅकलॉगसह) आयोजीत केलेल्या **कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, विधी, वास्तुशास्त्र व इतर सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षात घेता, पुढे ढकलण्यात आल्या असून, सदरच्या परीक्षा खाली नमूद केलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे त्याच वेळेस, ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने, त्याच परीक्षा केंद्रांवर सुधारीत तारखांना आयोजीत करण्यात येत आहेत.**

| अ.क्र. | विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी यापूर्वी जाहीर केलेली तारीख व वार | विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी सुधारीत तारीख व वार |
|---|---|---|
| 01 | 21.10.2020 (बुधवार) | **01.11.2020 (रविवार)** |
| 02 | 22.10.2020 (गुरुवार) | **09.11.2020 (सोमवार)** |
| 03 | 23.10.2020 (शुक्रवार) | **10.11.2020 (मंगळवार)** |
| 04 | 28.10.2020 (बुधवार) | **11.11.2020 (बुधवार)** |
| 05 | 29.10.2020 (गुरुवार) | **12.11.2020 (गुरुवार)** |

तरी आपणास विनंती करण्यात येते की, सदर बाब सर्व संबंधित विद्यार्थी, शिक्षक, पर्यवेक्षक, वरिष्ठ पर्यवेक्षक, परीक्षा समन्वयक व परीक्षेशी संबंधित त्या-त्या सर्व घटकांच्या निदर्शनास आणून देऊन, सुधारीत तारखांना त्याच वेळेस, ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने, त्याच परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेऊन सदर परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठीः-**

1) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
2) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) मा. प्र कुलसचिव, कबचौउमवि, जळगाव
4) परीक्षा व मूल्यमापन मंडळातील सर्व संबंधित अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
5) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव -- वर्तमानपत्रात वरीलबाबत बातमी प्रसिध्दीसाठी
6) **समन्वयक, विद्यार्थी ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगाव.**